# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-९४ दिनांक - १४/०३/२०२४

## ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम रुपये १,७५,०००/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील तुळींज पोलीस ठाणे हद्दीत राहणारे श्री. संदेश तांदळे यांनी इंन्स्टाग्रावर आलेल्या ऑनलाईन इन्वेस्टमेंट जाहिरातीवर क्लिक केले असता त्यांना टेलिग्राम ग्रुपवर जोडण्यात येवुन त्यांची ऑनलाईन टास्क द्वारे त्यांची १,७५,०००/- रु ची फसवणूक झाल्याबाबत तक्रार त्यांनी **www.cybercrime.gov.in** यावर दि. १२/०७/२०२३ रोजी दिली होती.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरचे सर्व व्यवहार वेगवेगळया बँकेचे खात्यावर गेल्याचे दिसून आले. तात्काळ तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत संबधीत बँक यांचेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करून व सातत्यपुर्ण पाठपुरावा करून नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व मा.प्रथम वर्ग न्यायदंडधिकारी ४ थे न्यायालय वसई यांच्या आदेशाने सदरची फसवणूक रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- गुंतवणुकीचे निर्णय घेताना काळजी घ्या, तुमचे पैसे हुशारीने गुंतवा.
- कंपन्यांच्या खात्रीशीर आणि जास्त परताव्याच्या खोटया दाव्यांना वळी पडू नका
- फेसबुक, इन्स्टाग्राम अथवा व्हॉट्सॲपवर जास्त परतावा देण्याऱ्या प्रमोशनल ॲडवर विश्वास ठेवू नका. याद्वारे आपली आर्थीक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अशा प्रकारच्या फसवणूकीमध्ये टेलीग्राम चॅनेल, व्हॉटसप ग्रुपवर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे स्क्रिनशॉट, मॅसेजेस दाखवून पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत्त केले जाते. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवून फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणूकदारांना जास्त व खात्रीशीर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणूकीमध्ये आर्थिक फसवणूक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.
- क्रिप्टो माक्रेट, शेअर मार्केट किंवा म्युच्युअल फंडातील गुंतवणूकीत जोखीम असते. यामध्ये फायदयाप्रमाणे नुकसान होण्याचीही शक्यता असते. अशी गुंतवणूक करण्या अगोदर आपल्या वित्तीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणूक करा.
- कोणतेही अनोळखी ॲप्लीकेशल डाउनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

**मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, पोअं/१२०९५ गणेश ईलग, मपोअं/१३१०४ पल्लवी निकम, पोअं./२२०४० प्रशांत बोरकर मसुब/प्रविण सांवत व मसुब/सोनाली मोरे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- **www.cybercrime.gov.in**